महाराष्ट्र शासन
प्राथमिक शिक्षण संचालनालय
डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१.
दुरध्वनी : (०२०) २६१२५६९२ ई-मेल depmah2@gmail.com

जा.क्र./प्राशिसं/आरटीई-५२०/२०२२/७३६ सुधारीत पत्र दिनांक : /०२/२०२२
28 FEB 2022

प्रति,

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
२. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई, महानगरपालिका,
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सर्व.
४. प्रशासन अधिकारी (नपा/मनपा) सर्व.

**विषय :- सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रात आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी बालकाचे किमान वय निश्चित करण्याबाबत.**

**संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक:-आरटीई-२०१८/प्र.क्र.१८०/एस.डी.-१, दिनांक १८/०९/२०२०.**
**२. शासन निर्णय क्रमंक:-आरटीई-२०१९/प्र.क्र.११९/एस.डी.-१ दिनांक २५/०७/२०१९**

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रात शाळा प्रवेशासाठी बालकाचे किमान वय निश्चित करण्याबाबत खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

शाळा प्रवेशासाठी बालकाचे किमान वय निश्चित करण्याबाबत दिनांक १८/०९/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मानीव दिनांक ३१ डिसेंबर करण्यात आला आहे. शासनाने किमान वयोमर्यादा ठेवलेली आहे परंतू कमाल वयोमर्यादा नाही. मानिव दिनांक बदलामुळे माहे जुलै ते नोव्हेंबर महिन्यात जन्मलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ साठी आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी वयोमर्यादा माहे ३१ डिसेंबर २०२२ अखेर पुढील प्रमाणे वय असणे आवश्यक आहे.

| अ.क्र | प्रवेशाचा वर्ग | वयोमर्यादा | दि ३१ डिसेंबर २०२२ रोजीचे कमाल वय |
|---|---|---|---|
| १. | प्ले ग्रुप / नर्सरी | १ जुलै २०१८ - ३१ डिसेंबर २०१९ | ४ वर्ष ५ महिने ३० दिवस |
| २. | ज्युनियर केजी | १ जुलै २०१७ - ३१ डिसेंबर २०१८ | ५ वर्ष ५ महिने ३० दिवस |
| ३. | सिनियर केजी | १ जुलै २०१६ - ३१ डिसेंबर २०१७ | ६ वर्ष ५ महिने ३० दिवस |
| ४. | इयत्ता १ ली | १ जुलै २०१५ - ३१ डिसेंबर २०१६ | ७ वर्ष ५ महिने ३० दिवस |

आरटीई २५ टक्के प्रवेशाकरीता वयोमर्यादेबाबत आपल्यास्तरावरुन मोफत प्रसिध्दी देण्यात यावी. वयोमर्यादेबाबत ऑनलाईन पोर्टलवर तसेच सर्व शाळांना आपल्यास्तरावरुन कळविण्यात यावे जेणेकरुन या कार्यालयाकडे वयोमर्यादेबाबतच्या कोणत्याही तक्रारी येणार नाहीत.

(दिनकर टेमकर)
शिक्षण संचालक (प्राथमिक)
शिक्षण संचालनालय, पुणे - १.

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर :**

१) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
२) मा. आयुक्त (शिक्षण) म.रा. पुणे.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :**

मा. तांत्रिक संचालक, एन.आय.सी. पुणे.

Scanned by CamScanner